DVP College Nimgaonsawa

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलग्नित,

# श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित,

# दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा, तालुका- जुन्नर, जिल्हा -पुणे.

## अँटी रॅगिंग अहवाल

प्रस्तावना-

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये UGC च्या (D.O.NO.F 1-74/2016 (ARC) दिनांक 5 जुलै 2023 च्या परिपत्रकानुसार महाविद्यालयात दिनांक 12 ऑगस्ट ते 18 या दरम्यान सप्ताह साजरा करावा असे स्पष्ट करण्यात आले होते. सदर परिपत्रकानुसार अँटी रॅगिंग सप्ताह मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उदाहरणार्थ - निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, सेमिनार, पोस्टर प्रदर्शन इत्यादी सदर कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल पुढील प्रमाणे :

1. निबंध स्पर्धा-

सदर परिपत्रकानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा आयोजित केली होती. " रॅगिंग मुक्त महाविद्यालय, माझी जबाबदारी " या विषयावर जवळपास 10 विद्यार्थ्यांनी निबंध सादर केले. त्यापैकी

1. गाडगे तेजल सुनील 2. खणकर ओंकार विठ्ठल 3. गुंजाळ अजिंक्य शिवाजी

या तीन विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक संपादित केला.

2. सेमिनार-

या कार्यशाळेमध्ये प्राध्यापक आशिष गाडगे सर यांनी विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग विषयी माहिती दिली. त्यांनी आपल्या मनोगतातून रॅगिंग मनाई करण्यासाठी भारतीय सर्वोच्च न्यायालयाने अधिनियम तयार केला असून कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना शारीरिक किंवा मानसिक हानी पोहोचत असेल किंवा पोहोचण्याची शक्यता असेल, विद्यार्थ्यांमध्ये भयाची भावना, लज्जेची भावना निर्माण करणे असे गैरवर्तणुकीचे प्रदर्शन रॅगिंग समजले जाणार आहे असे सांगितले.

प्राध्यापिका गायकवाड ज्योती मॅडम यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग विषयी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र अँटी रॅगिंग प्रतिबंधक कायदा 1991 नुसार महाविद्यालय परिसरामध्ये किंवा महाविद्यालयाबाहेर रॅगिंग करणे कायद्यानुसार गुन्हा आहे. या कायद्यातील नियम व तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांस दोन वर्षापर्यंत कारावास आणि रुपये पंचवीस हजार ते एक लाख रुपये पर्यंत आर्थिक दंड होऊ शकतो. या कायद्यानुसार दोषी ठरणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयातून निलंबित करण्यात येईल. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कायमस्वरूपी प्रवेश घेण्यास बंदी घातली जाईल असे सांगितले. या पद्धतीने विद्यार्थ्यांमध्ये अँटी रॅगिंग संबंधी जागृती करण्यात आली.

3.पोस्टर प्रदर्शन-

महाविद्यालयात रॅगिंग संदर्भात पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पोस्टर पाहून चर्चा,संवाद साधला व आपली जबाबदारी काय आहे याचे त्यांना ज्ञान झाले.

CamScanner

4. घोषवाक्य रॅली –

यामध्ये रॅगिंग इज अ क्राईम रिव्हाइड इज जेल, सपोर्ट द चेंज,सपोर्ट अँटी रॅगिंग इत्यादी घोषवाक्य विद्यार्थ्यांनी बनवून आणले. यातून उत्कृष्ट घोषवाक्य निवडून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले.

1.जावळे हर्षदा प्रकाश 2. शिंदे योगेश मारुती 3. पटेल मुस्कान शाबुद्दीन

या तीन विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक संपादित केला.

5.short Film–

विद्यार्थ्यांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे अँटी रॅगिंग संदर्भात जागृती घडवून आणण्यासाठी प्रकारे अँटी रॅगिंग या संदर्भातील एक शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

6. शपथविधी –

मी रॅगिंग करणार नाही

मी रॅगिंग होऊ देणार नाही

माझे महाविद्यालय रॅगिंग मुक्त ठेवण्याचा मी संकल्प करत आहे.

" माझे महाविद्यालय रॅगिंग मुक्त ठेवणे ही माझी जबाबदारी आहे "

अशी प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांनी घेतली.

अशाप्रकारे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर छाया जाधव मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, व विद्यार्थी उपस्थित होते.

DVP College Nimgaonsawa

Jadhav

प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा, ता.जुन्नर, (पुणे) ४१०५०४




DVP College Nimgaonsawa

प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा, ता. जुन्नर, (पुणे) ४१०५०४



DVP College Nimgaonsawa

[signature]

प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा, ता. जुन्नर, (पुणे) ४१०५[illegible]

CS CamScanner




DVP College Nimgaonsawa

प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा, ता.जुन्नर, (पुणे)



DVP College Nimgaonsawa

प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा, ता.जुन्नर, (पुणे) ४१०५०४

CamScanner